पुढारी पा. नं. ५.

# चारित्र्याच्या संशयातून पत्नीचा निर्घृण खून

## अरोपी पतीला विरार पोलिसांनी ठोकल्या बेड्या

**मिरारोड : पुढारी वृत्तसेवा**

विरार पोलीस ठाणे हद्दीत एका घरात महिलेचे प्रेत आढळून आले होते. त्याचा विरार पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाने तपास करून तो खून झाल्याचे उघडकीस आणून तो खून तिच्या पतीने चारित्र्यावर संशय घेवून केल्याचे उघडकीस आणून त्याला अटक केले आहे.

विरार पोलीस ठाणे हद्दीतील १ फेब्रुवारी रोजी एका घरातून घाण वास येत असल्याची माहिती विरार पोलीस ठाण्यास फोनद्वारे मिळाली. माहिती मिळताच पोलीस पथकाने घटनास्थळी जाऊन पाहणी केली असता त्याठिकाणी एक अंदाजे २५ ते ३० वर्षे वयोगटातील एका महिलेचे प्रेत दिसून आले. त्याबाबत विरार पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्युची नोंद करण्यात आली होती. त्या ठिकाणी मयत झालेल्या महिलेचे नाव पिंकी ऊर्फ प्रियंका वैभव पाटील असून तिचा घातपाताने मृत्यु झाला असावा या संशयाने प्रेतावर विरार येथील वैद्यकीय रुग्णालयात पोस्टमार्टम केले होते. परंतु मृत्युचे नक्की कारण समजण्यासाठी प्रेत जे.जे. रुग्णालय, भायखळा, मुंबई येथे पाठविण्यात आले असता तिचा गळा दाबून मृत्यु झाला असल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला होता.

वरिष्ठ अधिकारी यांनी हा गुन्हा उघडकीस आणण्याचे गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी व अंमलदार यांना सूचना दिल्या होत्या. त्यानुसार गुन्हा उघडकीस आणण्यासाठी वेगवेगळी पथके तयार केली होती. गुन्हयाच्या घटनास्थळ व त्याच्या आजुबाजूच्या परिसरातील जवळपास २०० पेक्षा जास्त सी.सी.टि.व्ही. ची तपासणी करण्यात आली. परंतु, गुन्हयाच्या तपासाच्या अनुषंगाने पोलीस तपास पथकास काहीएक धागेदोरे हाती लागले नाहीत. त्यामुळे तपास पथकाने स्व:ताचा पती वैभव बाळाराम पाटील याचे आई-वडील, बहिण-भाऊ यांच्याकडे विचारपुस केली असता त्यांच्याकडूनही वैभव पाटील यांच्याबाबत व गुन्हयाबाबत कोणतीही माहिती मिळाली नाही. त्याच्या नातेवाईकांकडे केलेल्या चौकशीत वैभव पाटील याचा बालपणाचा मित्र संकेत रमेश राउत असून तो विरार येथे राहत असल्याची माहिती मिळाली. संकेत राउत याच्याकडे तपास केला असता त्याने वैभव पाटील याने त्याच्या पत्नीचे चारित्र्य ठीक नसल्याने तिला जिवे ठार मारायचे आहे असे सांगितले व दोघांनी मिळून तिची हत्या केल्याचे सांगितले. या गुन्हयात त्याचा सहभाग असल्याने त्याला अटक करण्यात आले.

पुढारी पु. पा. ३.

### उत्पन्नाचे स्त्रोत वाढविण्यासाठी सर्वसामान्यांना टार्गेट करू नका ; काँग्रेसची मागणी

**भाईंदर :** मिरा-भाईंदर महापालिकेत सध्या असलेल्या प्रशासकीय राजवटीने उत्पन्नाचे स्त्रोत वाढविण्यासाठी सर्वसामान्य नागरिकांना टार्गेट न करता त्यांना दिलासा देण्यासाठी कोणत्याही प्रकारची करवाढ न करता अर्थसंकल्प जाहीर करावा, अशी मागणी काँग्रेसचे प्रवक्ते प्रकाश नागणे यांनी महापालिका आयुक्त दिलीप ढोले यांच्याकडे केली आहे. कोणत्याही प्रकारच्या सेवा, सुविधा लोकांना सक्षमपणे मिळत नसताना शहरातील नागरीकांवर विविध मार्गांनी कर लादणे अपेक्षित नसल्याचे त्यांनी म्हटले. प्रशासनाने नव्याने १० टक्के रस्ता कर लागू करण्यासाठी प्रशासकीय ठराव मंजूर केला आहे. त्याला काँग्रेसचा तीव्र विरोध आहे. राज्यातील बहुतांश महापालिकांमध्ये प्रशासकीय राजवट असल्याने प्रशासक या नात्याने आयुक्तच अर्थसंकल्प जाहीर करणार आहेत. राज्यातील शिंदे-फडणवीस सरकारने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ओबीसी आरक्षण, वॉर्ड रचना, नगरसेवक संख्या, पॅनल पद्धत आदींचे कारण देत प्रकरण न्यायप्रविष्ठ करीत प्रलंबित ठेवल्या आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांवर प्रशासकीय राजवट किती असावी याचीही कालमर्यादा हवी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. महासभा घेण्याचा अधिकार महापौरांना असतो तर धोरणात्मक निर्णय, धोरण ठरविण्याचा अधिकार लोकप्रतिनिधींना असला तरी सध्या पालिकेतील प्रशासक या नात्याने राज्य शासनाने आयुक्तांना बहाल केलेले अधिकार तसेच प्रशासकीय राजवटीत स्थानिक लोकं भरडली जाऊ नये यासाठी आयुक्तांनी कोणतीही कर वाढ न करता अर्थसंकल्प जाहीर करावा, अशी मागणी त्यांनी केली आहे.

पुढारी पु. पा. २.

# ऑनलाईन एस्कॉर्ट सर्व्हिसच्या नावाखाली वेश्याव्यवसाय

## आरोपीस अटक; २ पीडित महिलांची सुटका

**मिरारोड : पुढारी वृत्तसेवा**

मिरा-भाईंदर परिसरात ऑनलाईन एस्कॉर्ट सर्व्हिसच्या नावाखाली वेश्याव्यवसाय चालवणाऱ्या आरोपीस अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष, भाईंदर यांनी अटक केली आहे. त्याच्याकडून २ पीडित महिलांची सुटका करण्यात आली आहे.

अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर यांना माहिती मिळाली की, संजय उर्फ विजय यादव (अंबावाडी, दहिसर पूर्व) याने इंटरनेटवरील वेबसाईटवर ऑनलाईन एस्कॉर्ट सर्व्हिस नावाची जाहिरात दिली होती. त्या जाहिरातीद्वारे मोबाईल नंबरवर गिऱ्हाईकाने संपर्क केल्यानंतर पुरुष गिऱ्हाईकाशी बोलणी करून व्हॉट्सअॅप मोबाईल नंबरवर पुरुष ग्राहकांना मुलीचे काही फोटो पाठवून वेश्यागमनाचे पैसे ठरवून मिरा-भाईंदर परिसरातील लॉजमध्ये रुम बूक करून ग्राहकाचे सोयीनुसार वेश्यागमनासाठी मुली पुरवित होता. तपास करून तो मुली घेऊन येणार असल्याची खात्री केली. जी. सी. सी. क्लब बिल्डींगसमोर, हाइकेश, काशिमीरा या ठिकाणी संजय उर्फ विजय यादव याने त्याचा साथीदार अॅटो रिक्षाचालक रविप्रसाद बाबुलाल यादव याचे रिक्षातून वेशागमनासाठी एका मुलीस पाठवून दिले असता रिक्षा चालक वेश्यादलाल रविप्रसाद बाबुलाल यादव याला ताब्यात घेण्यात आले. त्यांची चौकशी केली असता संजय उर्फ विजय यादव याचा साथीदार अभिषेक रजक, अॅटो रिक्षा चालक रविप्रसाद यादव असे इंटरनेटवरुन पुरुष ग्राहकांशी संपर्क करून पीडित महिलांना पैशाच्या मोबदल्यात वेश्यागमनासाठी प्रवृत्त करुन पाठविले जात असल्याचे निदर्शनास आल्याने रिक्षाचालक वेश्यादलाल रविप्रसाद यादव यास कारवाई करून रोख रक्कम व इतर मुद्देमालासह ताब्यात घेण्यात आले व २ पीडित महिलांची सुटका करण्यात आली. अटक व पाहिजे आरोपीविरुद्ध काशिमीरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

Scanned with CamScanner

लोकसत्ता ५१-२.१४.

# वसई, भाईंदरसाठी पोलीस भरती प्रक्रिया सुरू

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** मीरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालयातील पोलीस भरती प्रक्रिया शुक्रवारपासून सुरू झाली. पहिल्याच दिवशी महिलांची मैदानी चाचणी घेण्यात आली. महिला पोलिसांच्या २९४ जागांसाठी ११ हजार ७८७ अर्ज आले असून महिला -पुरुषांच्या एकूण ९९६ जागांसाठी ७४ हजार ४५८ उमेदवारांचे अर्ज आले आहेत. २८ फेब्रुवारीपर्यंत मैदानी चाचणी होणार आहे.

सध्या शिपाई पदाच्या ९८६ तर शिपाई वाहनचालक पदाच्या दहा अशा एकूण ९९६ पदांसाठी भरती सुरू आहे. पोलीस आयुक्त मधुकर पांडेय, अतिरिक्त पोलीस आयुक्त श्रीकांत पाठक यांच्या मार्गदर्शनाखाली शेकडो अधिकारी-अंमलदारांच्या बंदोबस्तात भरती प्रक्रिया सुरू आहे. महिलांच्या २९४ जागांसाठी ११ हजार ७८७ अर्ज आले आहेत. यामध्ये ३ महिलांसाठी चालक म्हणून जागा उपलब्ध आहे. प्रक्रिया इन-कॅमेरा होत आहे. मैदानी चाचणीत पात्र उमेदवारांची लेखी परीक्षा होणार आहे. एका पदामागे दहा उमेदवार लेखी परीक्षेसाठी निवडले जाणार आहे. ९९६ जागांपैकी खुल्या वर्गासाठी केवळ २७९ तर अनुसूचित जाती-जमाती विशेष मागासवर्ग आणि इतर मागासवर्गासाठी ७१७ पदे आहेत. महिलांसाठी ३० टक्के, खेळाडू ५ टक्के, निवृत्त पोलिसांचे पाल्य, प्रकल्पग्रस्त ३ टक्के, तर भूकंपग्रस्त २ टक्के, माजी सैनिक १५ टक्के आणि गृहरक्षक म्हणजेच होमगार्ड ५ टक्के तसेच अनाथांसाठी १ टक्का जागा आरक्षित आहेत.

## उच्चशिक्षित उमेदवारांचा समावेश

या पोलीस भरतीसाठी उच्चशिक्षित तरुण उमेदवारांचा सहभाग मोठा आहे. अगदी अभियंते, वकील, द्विपदवीधर झालेल्या तरुण उमेदवारांची संख्या मोठी आहे. त्यात १४१ बीटेक, ४ एमई, ३७१ आदी अभियंत्यांचा समावेश आहे. एमबीए ४५, एलएलबी १० उमेदवार आहेत. तर बीएस्सी पदवी घेतलेले ३ हजार ९५२ उमेदवार, एमएस्सी पदवी घेतलेले २७९ उमेदवार आहेत. बीए पदवीधर १४ हजार ८४३ उमेदवार आहेत. एमए झालेले १ हजार ७३७ उमेदवार आहेत.

# नालासोपाऱ्यातून अमली पदार्थांचा साठा जप्त

**नालासोपारा :** नालासोपारामध्ये १६ लाख ६० हजार रुपये किमतीचे मॅफिड्रॉन (एम डी) नावाचा अमली पदार्थ विक्री करणाऱ्या व्यक्तीला पकडण्यात यश मिळवले आहे. नालासोपाऱ्यातील कॅपिटल मॉलजवळ आचोळे पोलीस ठाणे हद्दीत रात्रीच्या वेळी अमली पदार्थ विरोधी कक्षाचे पथक गस्त घालत असताना एक संशयित व्यक्ती दिसला. त्याला हटकले असता तो पळू लागला. पोलिसांनी त्याचा पाठलाग करून त्याला पकडून त्याची अंगझडती घेतली असता, त्याच्याकडून ८३ ग्रॅम एमडी नावाचा अमली पदार्थ आढळून आला. या पदार्थाची किंमत १६ लाख ६० हजार असल्याचे पोलिसांनी सांगितले. अमली पदार्थ विकणाऱ्याचे नाव हुसेन सलीम सय्यद असे असून, तो नालासोपारा येथे राहतो. त्याचावर पोलिसांनी अमली पदार्थ विक्री केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. हे अमली पदार्थ त्यांनी कुठून आणले आणि ते कोणाकडे विक्री करणार होता, याचा शोध घेण्याचा प्रयत्न पोलीस करत आहेत.

← पुण्यनगरी ५.५१.१.

Scanned with CamScanner

लोकसत्ता ५.२.१४.

# दुभाजकाला वाहन धडकून मुंबईतील दोन जण ठार

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**वसई :** मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील विरारमधील सकवार गावाजळ शुक्रवारी सकाळी एका वाहनाने दुभाजकाला दिलेल्या धडकेत दोघांचा जागीच मृत्यू झाला तर अन्य दोन जण जखमी झाले.

मुंबईच्या प्रभादेवी येथे राहणारे मुसळे कुटुंबीय शुक्रवारी सकाळी मुंबईहून ह्युंदाई क्रेटा या गाडीतून पालघरच्या दिशेने निघाले होते. सकाळी साडेदहाच्या सुमारास गाडी सकवार गावाजवळून जात असताना चालकाचे नियंत्रण सुटल्याने गाडीने दुभाजकाला धडक दिली. यावेळी वाहनामध्ये चार जण होते. मांडवी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन जखमींना उपचारासाठी वसईच्या गॅलेक्सी या खासगी रुग्णालयात दाखल केले. दुपारी तीनच्या सुमारास चालक रुचिक यशवंत देसाई (३०) आणि रमेश बलभीम मुसळे (५१) यांचा मृत्यू झाला. तर गंभीर जखमी असेलल्या अशोक बलभीम मुसळे (७१) आणि माधुरी मुसळे (५०) यांच्यावर मीरा रोड येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत. वाहन अतिवेगाने असल्याने चालकाचे नियंत्रण सुटल्याने अपघात झाल्याची माहिती मांडवी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रफुल्ल वाघ यांनी दिली.

मुंबई

# यूट्युबवर व्हिडीओ लाइक करण्याच्या नादात पावणेपाच लाख गमावले

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**वसई :** यूट्युबवरील व्हिडीओ लाइक करून पैसे कमविण्याचा मोह एका तरुणाला चांगलाच महागात पडला. सायबर भामट्याने या तरुणाला तब्बल पावणेपाच लाखांना गंडा घातला.

काशिमिरा येथील गौरव एक्सलंन्सीमध्ये राहणाऱ्या विक्रमजीत सिंग (३०) या तरुणाला एका अनोळखी क्रमांकावरून फोन आला. यूटयुबवरील व्हिडीओ बघताना ते लाइक केल्यास घरबसल्या पैसे मिळतील अशी थाप त्या व्यक्तीने मारली.

फक्त व्हिडीओ लाईक करणे सोप्पे आहे, असे सिंग याला वाटले आणि तो या सापळ्यात अडकला. सायबर भामट्याने त्याला वेगवेगळे ॲप डाऊनलोड करून पैसे भरण्यासाठी सांगितले. ३० जानेवारी ते ४ फेब्रुवारी या कालावधीत सिंग याने ४ लाख ७३ हजार रुपये भरले. मात्र त्याला परतावा काहीच मिळाला नाही आणि फसवणूक झाल्याचे त्याच्या लक्षात आले.

यानंतर त्याने काशिमिरा पोलीस ठाण्यात तक्रार दिली. या तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात व्यक्तीच्या विरोधात फसणुकीचा ४२०, ३४ तसेच माहिती तंत्रज्ञान अधिनियमाच्या कलम ६६ सी आणि ६६ डी अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

# राष्ट्रीय महामार्गालगतच्या अनधिकृत बांधकामांवर पालिकेची कारवाई

## एकाच दिवशी सहा बांधकामे जमीनदोस्त

लोकसत्ता वार्ताहर

**भाईंदर :** मुंबई–अहमदाबाद या राष्ट्रीय महामार्गालगत उभारण्यात आलेल्या अनधिकृत हॉटेल आणि बंगल्यांच्या बांधकामावर पालिकेने अतिक्रमणविरोधी कारवाई केली आहे.एकाच दिवशी इतकी मोठी कारवाई झाली आहे.

मीरा-भाईंदर शहराचे स्थानिक आमदार प्रताप सरनाईक यांनी आठवडाभरापूर्वी पालिका आयुक्त दिलीप ढोले यांना पत्र लिहून अनधिकृत बांधकामांच्या वाढत्या संख्येकडे लक्ष देण्याच्या सूचना दिल्या होत्या. इतकेच नव्हे तर या गोष्टीला गांभीर्याने न घेतल्यास याची तक्रार थेट मुख्यमंत्र्यांना करणार असल्याचे जाहीर केले होते. यासाठी साधारण सात दिवसांचा कालावधी त्यांनी आयुक्तांना दिला होता.

त्यानुसार ही आठवड्याची मुदत संपत असतानाच शुक्रवारी प्रशासनाने अनधिकृत बांधकामांवर कारवाईची धकड मोहीम सुरू केली आहे. यात सर्वप्रथम पालिका हद्दीतील मुंबई-अहमदाबाद या राष्ट्रीय महामार्गालगत उभारण्यात आलेल्या बांधकामांना लक्ष्य करण्यात आले आहे. स्थानिक प्रभाग अधिकाऱ्यांसोबत अतिक्रमण विभागाने पहिल्याच दिवशी तीन अनधिकृत हॉटेल आणि तीन बंगल्यांच्या बांधकामांवर कारवाई केली असल्याची माहिती प्रभाग क्रमांक सहाचे अधिकारी सचिन बच्छाव यांनी दिली. काही दिवसांत मोठ्या प्रमाणात कारवाईची मोहीम राबवली जाणार असल्याची माहिती पालिकेकडून देण्यात आली आहे.

Scanned with CamScanner

लोकसत्ता पा.नं.१५.

# आत्महत्यांचे प्रमाण घटले

## २०२२ मध्ये प्रमाण २५० ने कमी; करोनामधील नैराश्याला उतरती कळा

सुहास बिऱ्हाडे, लोकसत्ता

**वसई :** करोनाकाळातील आलेल्या नैराश्यामुळे आत्महत्या करण्याचे वाढलेले प्रमाण २०२२ या वर्षात घटले आहे. वसई-विरारमध्ये २०२१ च्या तुलनेत २०२० मध्ये आत्महत्येचे प्रमाण २५० ने कमी झाले आहे.

२०२० मध्ये करोनाकाळ सुरू झाला. टाळेबंदीमुळे रोजगार बुडाले आणि अनेकांच्या नोकऱ्या गेल्या. यामुळे आर्थिक गणिते बिघडली होती. याशिवाय आजारपण, अस्थिरता, भीती आणि भविष्याची चिंता, यामुळे मोठ्या प्रमाणावर नैराश्य पसरले होते. या कारणांमुळे आत्महत्यांचे प्रमाण कमालीचे वाढले होते.

वसई-विरारमध्ये २०२० मध्ये ३६३, तर २०२१ मध्ये ४३० जणांनी आत्महत्या केल्या होत्या. परंतु, २०२२ मध्ये आत्महत्येचे प्रमाण कमालीचे घटले आहे. २०२२ मध्ये फक्त १७९ जणांनी आत्महत्या केल्या. २०२१ च्या तुलनेत हे प्रमाण २५१ ने कमी झाले आहे. कौटुंबिक वाद, आर्थिक चणचण, नैराश्य, सासरच्यांकडून छळ आदी प्रमुख कारणे असल्याचे पोलिसांनी सांगितले.

अभिनेत्री तुनिशा शर्माची आत्महत्या २०२२ मध्ये सर्वाधिक गाजली होती. तिने २४ डिसेंबर २०२२ रोजी नायगाव येथील स्टुडिओतच आत्महत्या केली होती. तिच्या आईने लव्ह जिहादचा आरोप केला होता. त्याचबरोबर मुंबईत प्रसिद्ध 'सुविधा' या कपड्यांच्या शोरूमचे संचालक कल्पेश मारू यांनी विरारमध्ये येऊन आत्महत्या केली होती. वसईच्या सागर नाईक या तरुणाने त्याची प्रेयसी सायलीची लॉजमध्ये हत्या केली आणि नंतर विहारमधील एका हॉटेलमध्ये गळफास घेऊन आत्महत्या केली.

### २०२२ मधील गाजलेल्या प्रमुख आत्महत्या

**● रिसॉर्टमध्ये हॉटेल व्यवस्थापकाची आत्महत्या**

नालासोपारा येथील कळंब परिसरातील डॉल्फिन रिसॉर्टचे व्यवस्थापक रामचंद्र अयरमल (६१) यांनी ९ मार्च २०२२ रोजी मध्यरात्री गळफास घेऊन आत्महत्या केली. कर्जबाजारी झाल्याने त्यांनी आत्महत्या केली.

**● अभिनेत्री तुनिशा शर्मा आत्महत्या**

अभिनेत्री तुनिशा शर्माने २४ डिसेंबर २०२२ रोजी वसईच्या नायगाव-जवळील एका स्टुडिओत गळफास घेऊन केलेली आत्महत्या देशभरात चर्चेचा विषय ठरली. याप्रकरणी पोलिसांनी तिचा माजी प्रियकर आणि अभिनेता शिझान खान याला अटक केली. अनेक महिन्यांच्या प्रेमसंबंधानंतर त्याने ब्रेकअप केल्यानंतर नैराश्यात जाऊन तुनिशाने आत्महत्या केल्याचा आरोप तुनिशाच्या आईने केला होता.

**● महिलेची मुलीसह गच्चीवरून उडी**

काशिमिरा परिसरातील नित्यानंदनगर मधील गौरव गॅलेक्सी या इमारतीत राहणाऱ्या रेखा देवासी (२८) हिने १७ सप्टेंबर २०२२ रोजी मुलगी अंकिता (वय ६) हिला घेऊन इमारतीच्या गच्चीवरून उडी मारून आत्महत्या केली.

**● गुटखा विक्रेत्याची आत्महत्या**

नालासोपारामधील गालानगर परिसरात राहणारा विशू गुप्ता (२६) याने १२ ऑगस्ट २०२२ रोजी गळफास घेऊन आत्महत्या केली. त्याला गुटखा विक्रीच्या संशयावरून आचोळे पोलिसांनी ताब्यात घेतले होते. पोलिसांच्या दबावामुळे त्याने आत्महत्या केल्याचा आरोप त्याच्या वडिलांनी केला होता. पोलिसांनी त्याच्याकडून पैसे मागून ते न दिल्यास गुन्हा दाखल करण्याची धमकी दिली होती. याप्रकरणी तीन पोलिसांची मुख्यालयात बदली करण्यात आली होती

**● मुंबईतील बेपत्ता व्यापाऱ्याचा विरारमध्ये मृतदेह**

मुंबईतून बेपत्ता असलेला व्यापारी कल्पेश मारू (४६) यांनी २० ऑगस्ट २०२२ रोजी विष प्राशन करून आत्महत्या केली आहे. विरारजवळ त्यांचा मृतदेह आढळला होता. ते दादरमधील प्रसिद्ध 'सुविधा' दुकानाचे मालक शांतीलाल मारू यांचा मुलगा होत. तो १५ ऑगस्टपासून बेपत्ता होता.

**● वसईत तरुणाची आत्महत्या**

वसई पूर्वेच्या वसंत नगरी सेक्टर २ मध्ये राहणाऱ्या १७ वर्षीय आनंद के. प्रसाद याने २२ ऑगस्ट २०२२ रोजी इमारतीच्या गच्चीवरून उडी मारून आत्महत्या केली.



### मागील चार वर्षांतील आत्महत्यांची आकडेवारी


| वर्ष | आत्महत्या |
|---|---|
| २०१९ | ३३७ |
| २०२० | ३६३ |
| २०२१ | ४३० |
| २०२२ | १७९ |

लोकसत्ता पा.नं.१५.

# अवजड वाहनांमधून क्षमतेपेक्षा अधिक मालाची वाहतूक

## वसईत वाहतूक नियमांचे उल्लंघन

**लोकसत्ता वार्ताहर**



**वसई :** वसई-विरार शहरातील विविध ठिकाणच्या रस्त्यांवर अजूनही अवजड वाहनांमधून क्षमतेपेक्षा अधिक मालाची वाहतूक सुरू आहे. त्यामुळे वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन होत असल्याने त्याचा फटका इतर वाहनांमधील प्रवासी व नागरिकांना बसू लागला आहे.

वसई-विरार शहरात सुरू असलेल्या विकासकामांमुळे माती, दगड, राडारोडा, खडी, ग्रीट पावडरची भुकटी यासह इतर साहित्यांची मागणी वाढली आहे. त्यामुळे त्याची महामार्ग व शहरातील इतर ठिकाणच्या रस्त्यांवरून मोठ्या प्रमाणात वाहतूक होत असल्याचे चित्र दिसून येत आहे. मात्र, काही वाहने क्षमतेपेक्षा अधिक माल भरून वाहतूक करू लागले आहेत. या वेळी वाहतुकीच्या नियमांचे पालन केले जात नाही. ट्रकवर अच्छादन टाकलेले नसल्याने अनेकदा त्यातून मोठ्या प्रमाणात भुकटी व धूलिकण हवेद्वारे बाहेर उडतात. त्याचा फटका त्यांच्या मागून जाणाऱ्या वाहनचालकांना बसत आहे. विशेषतः दुचाकीवरून प्रवास करणाऱ्यांना याचा अधिक त्रास सहन करावा लागतो. कधी-कधी महामार्गावरही मोठ्या प्रमाणात अशी वाहतूक होते. ही वाहतूक रोखण्यासाठी उपप्रादेशिक परिवहन विभागाकडून विशेष पथके नेमून कारवाई केली जाणार होती. मात्र, कोणत्याही प्रकारची कारवाई होत नसल्याने अजूनही क्षमतेपेक्षा अधिक मालभरून वाहतूक सुरूच आहे.

परिवहन विभाग याकडे दुर्लक्ष करीत असल्याने वाहतूकदार त्याचा गैरफायदा घेत आहेत. वाहने इतकी भरलेली असतात की चढणीच्या रस्त्यावर ती भार घेत नाहीत. यामुळे अपघाताचा धोका संभवतो. यासाठी उपप्रादेशिक परिवहन विभागाने, याकडे लक्ष देऊन नियमबाह्य होणाऱ्या वाहतुकीला आवर घालावा, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# पोलीस भरतीतील उमेदवारांना अल्पदरात भोजन

## सामाजिक संस्थेचा पुढाकार

**लोकसत्ता वार्ताहर**

**भाईंदर :** मीरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या प्रथम भरती प्रक्रियेत येणाऱ्या उमेदवारांसाठी अल्प दरात जेवणाची आणि प्रवासाची सोय सामाजिक संस्थेकडून करण्यात आली आहे. यामुळे अनेक गरजू उमेदवारांना याची मोठी मदत होत आहे.

मीरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालयाची प्रथम भरती प्रक्रिया भाईंदर पश्चिम येथील सुभाषचंद्र बोस मैदानात राबवली जात आहे. ही प्रक्रिया २ जानेवारीपासून सुरू झाली असून, पुढील काही दिवस चालणार आहे. यात राज्यातील विविध भागांतून आलेले उमेदवार सहभागी होत आहेत. मात्र, बऱ्याच उमेदवारांकडे राहण्याची सोय नसल्यामुळे ते नाइलाजाने रस्त्यावरच झोपत असल्याचे दिसून येत होते. त्यामुळे गरजू उमेदवारांच्या सोयीसाठी पोलीस आणि पालिका प्रशासनाने एकत्र येऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगरभवन, मीनाताई ठाकरे सभागृह आणि प्रमोद महाजन सभागृहात मोफत राहण्याची सोय केली आहे. याचा उमेदवारांना मोठा आधार मिळाला आहे.

परंतु, खेड्यापाड्यातून आलेल्या अनेक गरजू उमेदवारांच्या जेवणाचा मुख्य प्रश्न समोर येत आहे. त्यामुळे अशा उमेदवारांच्या सोयीसाठी आता छत्रपती शिवाजी महाराज चॅरिटेबल संस्थेकडून अल्प दरात भोजनाची व्यवस्था केली जात आहे. यात उमेदवारांना केवळ १० रुपयांत बिर्याणी, पाच रुपयांत दाल खिचडी आणि दोन रुपयांत चहा उपलब्ध करून दिला जात आहे. याच शिवाय प्रवास करणाऱ्या उमेदवारांच्या सोयीसाठी अल्प दरात बसचीही व्यवस्था केली असल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष सोमनाथ पवार यांनी दिली.

Scanned with CamScanner

# आत्महत्यांचे प्रमाण घटले

## २०२२ मध्ये प्रमाण २५० ने कमी; करोनामधील नैराश्याला उतरती कळा

**सुहास बिऱ्हाडे, लोकसत्ता**

**वसई :** करोनाकाळातील आलेल्या नैराश्यामुळे आत्महत्या करण्याचे वाढलेले प्रमाण २०२२ या वर्षात घटले आहे. वसई-विरारमध्ये २०२१ च्या तुलनेत २०२० मध्ये आत्महत्येचे प्रमाण २५० ने कमी झाले आहे.

२०२० मध्ये करोनाकाळ सुरू झाला. टाळेबंदीमुळे रोजगार बुडाले आणि अनेकांच्या नोकऱ्या गेल्या. यामुळे आर्थिक गणिते बिघडली होती. याशिवाय आजारपण, अस्थिरता, भीती आणि भविष्याची चिंता, यामुळे मोठ्या प्रमाणावर नैराश्य पसरले होते. या कारणांमुळे आत्महत्यांचे प्रमाण कमालीचे वाढले होते.

वसई-विरारमध्ये २०२० मध्ये ३६३, तर २०२१ मध्ये ४३० जणांनी आत्महत्या केल्या होत्या. परंतु, २०२२ मध्ये आत्महत्येचे प्रमाण कमालीचे घटले आहे. २०२२ मध्ये फक्त १७९ जणांनी आत्महत्या केल्या. २०२१ च्या तुलनेत हे प्रमाण २५१ ने कमी झाले आहे. कौटुंबिक वाद, आर्थिक चणचण, नैराश्य, सासरच्यांकडून छळ आदी प्रमुख कारणे असल्याचे पोलिसांनी सांगितले.

अभिनेत्री तुनिशा शर्माची आत्महत्या २०२२ मध्ये सर्वाधिक गाजली होती. तिने २४ डिसेंबर २०२२ रोजी नायगाव येथील स्टुडिओतच आत्महत्या केली होती. तिच्या आईने लव्ह जिहादचा आरोप केला होता. त्याचबरोबर मुंबईत प्रसिद्ध 'सुविधा' या कपड्यांच्या शोरूमचे संचालक कल्पेश मारू यांनी विरारमध्ये येऊन आत्महत्या केली होती. वसईच्या सागर नाईक या तरुणाने त्याची प्रेयसी सायलीची लॉजमध्ये हत्या केली आणि नंतर विहारमधील एका हॉटेलमध्ये गळफास घेऊन आत्महत्या केली.

### २०२२ मधील गाजलेल्या प्रमुख आत्महत्या

**● रिसॉर्टमध्ये हॉटेल व्यवस्थापकाची आत्महत्या**

नालासोपारा येथील कळंब परिसरातील डॉल्फिन रिसॉर्टचे व्यवस्थापक रामचंद्र अयरमल (६१) यांनी ९ मार्च २०२२ रोजी मध्यरात्री गळफास घेऊन आत्महत्या केली. कर्जबाजारी झाल्याने त्यांनी आत्महत्या केली.

**● अभिनेत्री तुनिशा शर्मा आत्महत्या**

अभिनेत्री तुनिशा शर्माने २४ डिसेंबर २०२२ रोजी वसईच्या नायगाव-जवळील एका स्टुडिओत गळफास घेऊन केलेली आत्महत्या देशभरात चर्चेचा विषय ठरली. याप्रकरणी पोलिसांनी तिचा माजी प्रियकर आणि अभिनेता शिझान खान याला अटक केली. अनेक महिन्यांच्या प्रेमसंबंधानंतर त्याने ब्रेकअप केल्यानंतर नैराश्यात जाऊन तुनिशाने आत्महत्या केल्याचा आरोप तुनिशाच्या आईने केला होता.

**● महिलेची मुलीसह गच्चीवरून उडी**

काशिमिरा परिसरातील नित्यानंदनगर मधील गौरव गॅलेक्सी या इमारतीत राहणाऱ्या रेखा देवासी (२८) हिने १७ सप्टेंबर २०२२ रोजी मुलगी अंकिता (वय ६) हिला घेऊन इमारतीच्या गच्चीवरून उडी मारून आत्महत्या केली.

**● गुटखा विक्रेत्याची आत्महत्या**

नालासोपारामधील गालानगर परिसरात राहणारा विशू गुप्ता (२६) याने १२ ऑगस्ट २०२२ रोजी गळफास घेऊन आत्महत्या केली. त्याला गुटखा विक्रीच्या संशयावरून आचोळे पोलिसांनी ताब्यात घेतले होते. पोलिसांच्या दबावामुळे त्याने आत्महत्या केल्याचा आरोप त्याच्या वडिलांनी केला होता. पोलिसांनी त्याच्याकडून पैसे मागून ते न दिल्यास गुन्हा दाखल करण्याची धमकी दिली होती. याप्रकरणी तीन पोलिसांची मुख्यालयात बदली करण्यात आली होती

**● मुंबईतील बेपत्ता व्यापाऱ्याचा विरारमध्ये मृतदेह**

मुंबईतून बेपत्ता असलेला व्यापारी कल्पेश मारू (४६) यांनी २० ऑगस्ट २०२२ रोजी विष प्राशन करून आत्महत्या केली आहे. विरारजवळ त्यांचा मृतदेह आढळला होता. ते दादरमधील प्रसिद्ध 'सुविधा' दुकानाचे मालक शांतीलाल मारू यांचा मुलगा होत. तो १५ ऑगस्टपासून बेपत्ता होता.

**● वसईत तरुणाची आत्महत्या**

वसई पूर्वेच्या वसंत नगरी सेक्टर २ मध्ये राहणाऱ्या १७ वर्षीय आनंद के. प्रसाद याने २२ ऑगस्ट २०२२ रोजी इमारतीच्या गच्चीवरून उडी मारून आत्महत्या केली.



### मागील चार वर्षांतील आत्महत्यांची आकडेवारी

| वर्ष | आत्महत्या |
|---|---|
| २०१९ | ३३७ |
| २०२० | ३६३ |
| २०२१ | ४३० |
| २०२२ | १७९ |

लोकसत्ता Sat, 11 February 2023
https://epaper.loksatta.com/c/71652986

Scanned with CamScanner

# चारित्र्याच्या संशयावरून पत्नीचा खून करणारा आरोपी पती गजाआड

## गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगिरी

विशेष प्रतिनिधी

वसई, दि. १० : पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेऊन पत्नीचा खून करून फरार झालेल्या आरोपीस अटक करण्यात विरार पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाला यश आले आहे. हकीकत अशी की, मागील आठवड्यात (दि. ५) दुपारच्या सुमारास रूम नं. ५०२, जय जीवदानी अपार्टमेंट, नारंगी बायपास रोड, विरार (पूर्व) येथून घाण वास येत असल्याची माहिती विरार पोलिसांना दूरध्वनी वरून मिळाली. पोलीस पथकाने तत्काळ घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. एका मृत महिलेचे शव ताब्यात घेऊन विरार पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यू रजि.नं. २४/२०२३ क्री.प्रो.को. कलम १७४ प्रमाणे नोंद करण्यात आली. मयत महिलेचे नाव पिंकी उर्फ प्रियंका वैभव पाटील असून तिचा घातपाताने मृत्यू झाला असावा असा प्राथमिक अंदाज होता. विरार ग्रामीण रुग्णालयांच्या डॉक्टरांनी पोस्टमार्टम केले होते.

परंतु मृत्यूचे नक्की कारण समजण्यासाठी जेजे हॉस्पिटल, मुंबई येथे पाठवण्यात आले. तिचा गळा दाबल्याने मृत्यू झाला असल्याचे स्पष्ट झाले. विरार पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपी विरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्ह्याची उकल करण्यासाठी वेगवेगळी पथके तयार करून घटनास्थळ व त्याच्या आजूबाजूच्या परिसरातील जवळपास शंभरहून अधिक सीसीटीव्हीची तपासणी करण्यात आली. परंतु पोलीस तपास पथकास काहीच हाती लागले नाहीत.



म्हणून पोलिसांनी मृत महिलेचा पती वैभव बाळाराम पाटील रा मानीवली, दुगाड, ता. भिवंडी याचे आई-वडील व भाऊ-बहीण यांच्याकडे विचारपूस केली. त्यांच्याकडूनही वैभव पाटील याचा ठाव ठिकाणांबाबत माहिती मिळाली नाही. तांत्रिक माहितीच्या आधारे चौकशीत वैभव पाटील याचा बालपणाचा मित्र संकेत रमेश राऊत हा सध्या विरार येथे राहत असल्याची माहिती समोर आल्याने संकेत राऊत याची कसून चौकशी केला. वैभव पाटील याने पत्नीचे चारित्र्य ठीक नसल्याने तिला जीवे ठार मारायचे असल्याने दोघांनी मिळून तिची हत्या केल्याची कबुली दिली.

गुन्ह्याच्या तिसऱ्या दिवशी आरोपी वैभव पाटील हा टिटवाळ, खडवली येथील भातसा नदीच्या पुलावर कल्याण परिसरात असल्याचे तांत्रिक विश्लेषणावरून समजले. पोलीस पथकाने या परिसरा दिवस-रात्र सापळा लावून भातसा नदीपूल, खडवली येथून आरोपी पतीला ताब्यात घेण्यात आले. त्याच्यावर खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आली आहे. गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस निरीक्षक विठ्ठल चौगुले हे करीत आहेत. परिमंडळ-३ चे पोलीस उपायुक्त सुहास पावचे, विरार विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त रामचंद्र देशमुख, विरार पो.स्टे. चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कांबळे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) दिलीप राख, पोलीस निरीक्षक (प्रशासन) विठ्ठल चौगुले यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखेतील सहा.पोलीस निरीक्षक रुपेश दळवी, पोउपनिरी. संदेश राणे, पोहवा. सचिन लोखंडे, संदीप जाधव, संदीप शेरमाळे, इंद्रनील पाटील, विशाल लोहार, पोअं. रवी वानखेडे, सुनील पाटील, युवराज वाघमोडे, सचिन ओलेकर, सागर घुगरकर, दत्तात्रय जाधव तसेच परिमंडळ-३ कार्यालयातील अनिल शेलार, नामदेव ढोणे यांनी कामगिरी केली आहे.

# विनय उपाध्याय

विशेष प्रतिनिधी

वसई, दि. १० : १८-१९ फेब्रुवारी नालासोपारा प्रिमीयर लीग स्पर्धेची लि[illegible] झाली असून,अष्टपैलु विनय उपाध्यायव[illegible] लावण्यात आली. समेळगांव सामाजिक पुरस्कृत समेळगांव गोविंदा पथकाने आ[illegible] केलेल्या या एनपीएल चा लिलाव सोपारातील आई एकविरा हॉलमध्ये संपन्न झाला. निर्मल सिसी, दोस्ती एलेव्हन, हार्मोनी सिसी, लाव्या इलेव्ह[illegible] स्ट्रेंजर्स इलेव्हन, के.इलेव्हन, श्री साई इलेव्हन या आठ मातब्बर संघामध्ये ि[illegible]

Scanned with CamScanner

मुंबई चौफेर

# कमी वेळात प्रतिसाद देणारे पहिले पोलीस आयुक्तालय

भाईंदर - मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय हे डायल ११२ वर सर्वात कमी वेळात प्रतिसाद देणारे राज्यातील पहिले आयुक्तालय आहे. २०२२ या वर्षात मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयात ११२ वरून ३४ हजार ९८७ कॉल आले असून, ७ मिनिटे ३४ सेकंदांत प्रतिसाद देण्यात आला आहे, तर जानेवारी २०२३ या महिन्यात ३,९१८ कॉल आले असून, ३ मिनिटे ४९ सेकंदांत प्रतिसाद देण्यात आला आहे. पोलिसांनी ११२ वर आलेल्या सर्व म्हणजे १०० कॉलना प्रतिसाद दिल्याची माहिती आयुक्तलयामार्फत देण्यात आली आहे. यामुळेच कमी वेळात प्रतिसाद देणारे मीरा-भाईंदर, वसई-विरार हे पहिले आयुक्तालय ठरले आहे. डायल ११२ हा तत्काळ मदतीसाठी दिलेला क्रमांक आहे. यावर सर्वाधिक तक्रारी या भांडणे, मारामाऱ्या, गर्दुल्ले व व्यसनी यांची भांडण, ध्वनिप्रदूषण यांच्या असतात, मात्र याचबरोबर अनेकदा रस्त्यावर मुलींची काहीजण छेड काढत असल्याच्या तक्रारी देखील डायल ११२ वर आल्या आहेत. यामुळेच रस्त्यावरून महिला जात असताना त्यांना कोणत्याही क्षणी संकटाची जाणीव झाली, तर त्यांनी डायल ११२ वर कॉल करावा जेणे करून काही क्षणातच मदतीकरिता पोलीस घटनास्थळी उपस्थित राहतील. इमर्जन्सी रिस्पॉन्स वेहिकल आयुक्तलयाला प्राप्त झालेली आहेत. प्रतिसाद देण्याची वेळ आणखी कमी करण्याकरिता वेगवेगळे प्रयत्न व उपाय-योजना करण्यात येत आहेत.

Scanned with CamScanner

CMYK

वाहन चलाते वक्त फोन का इस्तेमाल पड़ेगा भारी ...पेज-3

MHT
मुंबई हिंदमाता टाइम्स
राष्ट्रीय हिन्दी दैनिक

सारा अली खान को छूने की एयरपोर्ट पर की गई कोशिश ...पेज-6

मुंबई, शनिवार 11 फरवरी 2023

RNI No. MAHHIN/2006/20347

| आज का पंचांग | सूर्योदय / सूर्यास्त | आज का मौसम | तापमान | शेयर बाजार | सराफा बाजार |
|---|---|---|---|---|---|
| संवत् 2079, माघ कृष्ण पक्ष पंचमी | 07.09 am / 06.37 pm | | अधिकतम 34°C, न्यूनतम 22°C | NSE / BSE | |


# वाहन चलाते वक्त फोन का इस्तेमाल पड़ेगा भारी

## कभी जेब खाली होने तो कभी जान को जोखीम





### हर घंटे 18 लोगों की मौत

आप को बता दें कि भारत में सड़क दुर्घटनों में हर घंटे 18 लोगों की जान जा रही है। वहीं इन हादसों में हर घंटे औसतन 44 लोग घायल हो जाते हैं। यह जानकारी सड़क परिवहन और राजमार्ग मंत्रालय द्वारा जारी अपनी वार्षिक रिपोर्ट रोड एक्सीडेंट्स इन इंडिया 2021 में सामने आई है। रिपोर्ट में जो आंकड़े साझा किए गए हैं उनके मुताबिक 2021 में 4,12,432 हादसे हुए थे। इन हादसों में करीब 1,53,972 बदनसीबों की मौत हो गई थी, जबकि 3,84,448 लोग किसी न किसी रूप में घायल हुए थे।

**राकेश सिंह**

**नालासोपारा।** सरकार लोगों को जागरूक करने के तमाम तरीकों और नियमों को लागू कर चूकी है और लगातार करती आ रही है, फिर लोग नियम और कानून की अनदेखी कर रहे हैं। जिसके चलते आए दिन सड़क हादसों में कईयों की जान जा रही है। यातायात नियम ते अनुसार गाड़ी चलाते समय मोबाइल फोन का इस्तेमाल नहीं करना चाहिए। लिहाजा इस पर काबू पाने के लिए संशोधित कानून अनुसार मोटर वेहीकल एक्ट के तहत गाड़ी चलाते वक्त फोन का इस्तेमाल करने वालों पर महाराष्ट्र सरकार वाहन चालक पर 10,000 रुपये का जुमार्ना लगाती है।

### साल भर में 10 लाख जुमार्ना

**वसूला**

यातायात विभाग के वसई और विरार परिमंडल ने पिछले एक साल के दौरान वाहन चलाते समय मोबाइल फोन पर बात करने वाले 604 वाहन चालकों के खिलाफ कार्रवाई की है। इनसे 10 लाख 39 हजार का जुमार्ना वसूला गया है।

अगर आप गाड़ी चलाते समय मोबाइल पर बात नहीं करते हैं तो आपके करोड़ों रुपए का नुकसान नहीं होता है। जीवन से ज्यादा महत्वपूर्ण कुछ नहीं है। इसलिए गाड़ी चलाते समय मोबाइल फोन पर बात न करें, अगर बहुत जरूरी है तो वाहन को एक तरफ रोक कर ही बात करें।

**सागर इंगोले (वरिष्ठ पुलिस निरीक्षक, वसई परिमंडल 2, ट्रैफिक विभाग)**

Scanned with CamScanner

दैनिक
मुंबई, नवीमुंबई, ठाणे, पालघर, भिवंडी व कल्याण से एक साथ प्रसारित
# प्रभाव समाचार
संपादकः विशाल सिंह
www.prabhavsamachar.com
● वर्ष : ०८ ● अंक : १३५ ● ठाणे, शुक्रवार 10 फरवरी 2023 RNI No.: MAHHIN/2015/65000 ● पृष्ठः ८ ● मूल्य २ रु.

# गिरफ्तार आरोपियों पर दर्ज है कई गंभीर मुकदमे, आखिर पेल्हार पुलिस ने पकड़ लिया

अजहर शेख : संवाददाता

वसई : पेल्हार पुलिस स्टेशन की डिटेक्शन ब्रांच टीम को एक बड़ी सफलता हाथ लगी है, दरअसल टीम ने एटीएम में ठगी करने वाली गैंग के चार सदस्यों को धर दबोच कर उसे गिरफ्तार किया है, यह गैंग अंतरराज्यीय गिरो का है, इनके पास से टीम ने 5 लाख से अधिव माल व 16 अपराधों (धोखाधड़ी) की गुत्थ सुलझाने में कामयाबी मिली है। यह जानकार पुलिस ने गुरुवार को दी है। पुलिस ने बताया वि पेल्हार थाने क्षेत्र शिकायतकर्ता रितेश धर्मराज यादव (22) के काका हरीलाल यादव एटीएम पैसा निकालने हेतु गए थे, जहां चार अज्ञात लोग ने एटीएम कार्ड की अदला बदली कर उनके साथ धोखाधड़ी करके कुल 4000 रुपये निकाल लिए, इस मामले में रितेश ने पेल्हार थाने में उक्त 4 अज्ञात लोगों के ऊपर एफआईआर दर्ज करवाया था, पुलिस ने बताया कि, चूंकि अपराध के संबंध में मामला दर्ज किया गया था, इसलिए सीसीटीवी फुटेज का बारीकी से निरीक्षण करने पर उक्त के अपराध में सीसीटीवी जैसे फुटेज से आरोपी का पता चला, आरोपी के बारे में पूछताछ करने पर पता चला कि आरोपी अपने आवासीय पते पर उपलब्ध नहीं था, लेकिन वह समय-समय पर अपना पता और मोबाइल नंबर बदल रहा था। लगातार दो महीनों तक आरोपियों पर नज़र रखने के बाद, जैसे ही आरोपियों को पता चला कि पुलिस उन पर नज़र रख रही है, वे महाराष्ट्र से दमन, गुजरात, राजस्थान, हरियाणा, मध्य प्रदेश गए और अपनी स्विप्ट कार



के साथ मध्य प्रदेश होते हुए महाराष्ट्र लौट आए, विश्वसनीय सूचना मिलने पर पेल्हार थाने के डिटेक्शन ब्रांच के पुलिस उपनिरीक्षक/सनिल पाटिल एवं उनकी टीम, उन्होंने उक्त आरोपियों को हिरासत में लेने के संबंध में शिरपुर थाना प्रभारी सपोनी/शिरसाठ को फोन पर विस्तृत जानकारी दी. इसी बीच सपोनी/शिरसाठ की टीम ने आरोपी को स्विप्ट कार समेत दबोच लिया, उसके तुरंत बाद पुलिस उप निरीक्षक/सनिल पाटिल और उनकी टीम ने (1).विकी पंडीत सालवे (32),(2).विकी राजु वानखेडे, (3) अनिल कडोबा वेलदोडे (29), वैभव आत्माराम महाडीक (34) को धुले जाकर हिरासत में लेकर उन्हें गिरफ्तार किया।पुलिस के मुताबिक, इनके पास से विभिन्न बैंक के 94 एटीएम कार्डधारक की जानकारी प्राप्त की, यह पाया गया है कि आरोपियों ने विभिन्न लोगो से 9,00,000 रुपये की धोखाधड़ी की है। अपराध की आय से आरोपी से 4,00,000 रुपये स्विप्ट कार खरीदी, 89,000/- नकद राशि, साथ ही 39,000/- रुपये मूल्य की विभिन्न कंपनी का मोबाइल फोन भी, कुल 5,28,000 रुपये मूल्य का जब्त किया गया है। पुलिस ने बताया कि 16 अपराधों की गुत्थी यानी धोखाधड़ी सुलझ गयी है। पुलिस ने बताया कि आरोपी विकी पंडीत सालवे दो अपराधों (उल्हासनगर व बदलापुर थाना) में फरार था,आरोपी विकी पंडीत सालवे के ऊपर इसके पहले 13 अपराध, आरोपी विकी राजु वानखेडे के ऊपर इसके पहले 10 अपराध व अनिल कडोबा वेलदोडे के ऊपर इसके पहले 3 अपराध दर्ज किए जा चुके है।पुलिस ने कहा कि यह पुलिस के लिए बड़ी कामयाबी है। यह कार्रवाई डीसीपी सुहास बावचे व एसीपी रामचंद्र देशमुख के मार्गदर्शन में पेल्हार थाने के सीनियर पीआई बसंत लब्दे के नेतृत्व में पीआई (क्राइम) महेंद्र शेलार व पीएसआई सुनील पाटिल की टीम ने की है।

Scanned with CamScanner



# भायंदर में पुलिस की गोली से शहीद हुवे नागरिकों को श्रद्धांजलि

**संवादाता/मीरा- भाईंदर**

संघर्ष सेवा समिति, भायंदर के अध्यक्ष एवं क्रांतिकारी नेता गौतम जैन ने प्रति वर्ष की तरह इस वर्ष भी भायंदर ( पूर्व ) स्थित बी.पी.रोड़ नाका पर व्यास शहीद चौक स्मारक पर पुष्पांजलि अर्पित कर सन 1985 में पुलिस की गोली से शहीद हुवे नागरिकों को श्रद्धांजलि अर्पित की। इस मौके पर भाईंदर भूमि के संपादक पी.एल.चतुर्वेदी लाल , वरिष्ठ-पत्रकार देवेंद्र पोरवाल, सीनियर रिपोर्टर एवं लेखक एस. एस. राजू, क्रांतिकारी नेता उपेंद्र सिंह वत्स , अन्याय विरोधी संघर्ष समिति के अध्यक्ष एवं स्पेशल क्राइम रिपोर्टर सुभाष पांडेय , युवा नेता संजय जैन, कर्मठ समाजसेवक लक्ष्मीचंद टाटिया, ज़नाब अज़ीज़ अहमद, फ़रीद अहमद, भूमिपुत्र विनोद पाटील, योगी चतुर्वेदी विशेष रूप से उपस्थित थे। आवागमन कर रहे नागरिकों ने भी शहीद चौक स्मारक पर पुष्पांजलि अर्पित कर शहीद नागरिकों को श्रद्धांजलि दी तथा अमर रहे, अमर रहे, भाईंदर के शहीद अमर रहे एवं जब तक सूरज-चांद रहेगा, शहीदों तेरा नाम रहेगा नारे से भाईंदर स्टेशन के बाहर का प्रांगण गूंज उठा। भायंदर के क्रांतिकारी नेता ने बताया कि, 5 फरवरी 1985 को रेल रोको आंदोलन के दौरान आमरण अनशन पर बैठे आंदोलनकारी पुलिस की गोली से शहीद हो गए थे। जिनमें 7 नागरिकों के नाम शहीद 1 ) बसंत बाबूलाल शाह, 2 ) दत्ताराम तात्या आबे, 3 ) हितेश सी. पारिख, 4 ) एल.के.शाह, 5 ) रशीद मियां, 6 ) मेघराज एन. जाधव एवं 7 ) प्रणिलाल शाह बताए जाते हैं। जिनकी स्मृति में यह शहीद चौक स्मारक उस समय बनाया गया था। जहां हर वर्ष 5 फरवरी को प्रति वर्ष शहीद चौक स्मारक पर भायंदर के शहीद नागरिकों को पुष्पांजलि अर्पित कर याद किया जाता है। भायंदर के नागरिकों ने चर्चगेट से भायंदर तक लोकल ट्रेन चलाने की मांग की थी। जिस मांग को लेकर नागरिकों ने राजधानी ट्रेन को रोककर उग्र-आंदोलन कर दिया था। साल भर शहीद स्मारक चौक का रखरखाव ज़नाब अज़ीज़ अहमद मुख्तार देखते हैं।

Scanned with CamScanner